Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

Original Article

# राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री – विषयक व अस्पृश्यता निवारण कार्य : एक सामाजिक व ऐतिहासिक अभ्यास

**प्रा.अशोक शंकर शिंदे**
पंचक्रोशी शिक्षण मंडळ, सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर .
E-mail-Id- ashokshinde2691986@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180320
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(A)
Pp. 103-106
March- 2026
**Submitted:** 15 Feb. 2026
**Revised:** 25 Feb. 2026
**Accepted:** 10 Mar. 2026
**Published:** 31 Mar. 2026

गोषवारा –

या संशोधनाचा मुख्य उद्देश राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री – विषयक व समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा आहे. सदर शोध निबंध हा वर्णनात्मक स्वरूपाचा आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे. बहुजन समाजाचा उद्धार करणाऱ्या महात्मा फुल्यांचा वारसा चालविणारा राजा म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासात त्यांचे एक महत्त्वपूर्ण स्थान आहे.राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर गादीची सुत्रे हाती घेताच आपल्या रयतेला दिलासा देणारा जाहिरनामा प्रसिद्ध केला. महाराजांनी जनकल्याणाचा जणू विडाच उचलला होता.त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे. या उद्देशाने प्रेरित होऊन खास करून वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्य निवारणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अस्पृश्य निवारण कार्यास गती मिळाली. प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण व स्त्री- विषयक केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

की – वर्ड्स :- अस्पृश्यता, आधुनिक, वारसा, जाहिरनामा.

प्रस्तावना :-

१९ व्या शतकाच्या अखेरीस भारतीय समाज जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रीदास्याच्या शृंखलेत अडकलेला होता. महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा वारसा पुढे चालवत, राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सामाजिक समतेची पायाभरणी केली. शिक्षणाशिवाय स्त्री प्रगती अशक्य आहे, हे ओळखून महाराजांनी मुलींसाठी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु केले. स्त्री शोषणाला आला घालण्यासाठी १९१७ मध्ये विधवा पुर्नर्विवाह कायदा केला.देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायदे केले आणि महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले.दलित समाजाला हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी पाणवठे,शाळा,दवाखाने सर्वांसाठी खुले केले. अस्पृश्य समाजातील मुला – मुलींसाठी मोफत वसतिगृहे स्थापन केली, जेणेकरून ते शिक्षणातून स्वावलंबी बनू शकतील. राजर्षी शाहू महाराजांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर ते प्रत्यक्ष कृतीत आणले. त्यांचे कार्य हे पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करणारे होते. स्त्री आणि अस्पृश्य समाजाला सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून देणाऱ्या या महान सुधारकाच्या कार्याचे चिकित्सक अध्ययन करणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे.

*उद्दिष्टे :-

१)राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षणाविषयीच्या धोरणांचा व तत्कालीन स्त्रियांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२)कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता निवारणासाठी शाहू महाराजांनी उचललेली पावले व कायदे यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

३)शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वसतिगृहांची आणि त्यांच्या सामाजिक सुधारणांमधील भूमिकेची तपासणी करणे.

४)शाहू महाराजांच्या कार्यकाळात विधवा विवाह आणि देवदासी प्रथा निर्मुलनासाठी झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
प्रा.अशोक शंकर शिंदे, पंचक्रोशी शिक्षण मंडळ, सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर ..

**How to cite this article:**
*शिंदे, . अशोक . शंकर . (2026). राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री – विषयक व अस्पृश्यता निवारण कार्य : एक सामाजिक व ऐतिहासिक अभ्यास. Journal of Research & Development, 18(3(A)), 103–106.*
*https://doi.org/10.5281/zenodo.19630461*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19630461
OPEN ACCESS

*संशोधन प्रबंधाची गृहीतके :-

१)राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री – विषयक व अस्पृश्यता निवारण कार्य हे केवळ सुधारणावादी नसून ते सनातनी कार्य हे केवळ सुधारणावादी नसून ते सनातनी विचारसरणीला आव्हान देणारे क्रांतिकारी कार्य होते.

२)कोल्हापूर संस्थानातील शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणासारख्या धोरणांमुळे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजात आत्मसन्मान आणि सामाजिक जागृती निर्माण झाली.

३)शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या विशेष तरतुदी आणि विधवा पुर्नविवाह कायद्यामुळे तत्कालीन महिलांच्या सामाजिक दर्जामध्ये लक्षणीय सकारात्मक बदल झाला.

४)जातिभेद निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी केलेले कायदे आणि आंतरजातीय विवाहास दिलेले प्रोत्साहन यामुळे जातीच्या भिं ती कमकुवत होण्यास मदत झाली.

*संशोधनपद्धती :-

सदर शोध निबंधकरिता दुय्यम स्त्रोत पद्धतीने विविध प्रकारचे ग्रंथ,पुस्तके,मासिके,वर्तमानपत्र यांच्याद्वारे माहितीचे संकलन करून त्यांचे विश्लेषण समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केले आहे. प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

*विषय विवेचन :-

*शाहू महाराजांचे स्त्री –विषयक कार्य :-

१)स्त्री शिक्षण व सक्षमीकरण :-

शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांनी मुलींसाठी खास शाळा व वसतिगृहे स्थापन केली.

२)मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण :-

सप्टेंबर १९१७ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानात मुलींसाठी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु केले, जेणेकरून मागासवर्गीयांसह सर्वच स्तरांतील मुलींना शिक्षणाचा हक्क मिळावा.

३)घटस्फोटाचा हक्क :-

पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही अन्यायविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी घटस्फोटाचा प्रदान केला.

४)स्वसंरक्षण कायदे :-

महिलांच्या स्वसंरक्षणासाठी त्यांनी विशेष कायदे केले.

५)महिला शिक्षिका व प्रशिक्षण :-

महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी महिला प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन केली आणि महिला शिक्षिकांचा पुरवठा सुनिश्चित केला.

*राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्री जातीच्या संरक्षणासाठी केलेले कायदे :-

१)विधवा – पुनर्विवाह कायदा :-

१९१७ च्या जुलैमध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. हिंदूंच्या अनेक जातींत विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत इतर विवाहाप्रमाणे योग्य विधी न करण्याची पद्धती असल्यामुळे ज्या अनेक अडचणी निर्माण होत होत्या त्या या कायद्यान्वये दूर करण्यात आल्या. तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंद करण्याची पद्धती सुरु केली गेली.त्यामुळे विवाहविधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात राहू शकल्याने स्त्रीवर्गावर होणाऱ्या संभाव्य अन्यायाचा प्रतिकार करण्याचे एक साधन त्यांना उपलब्ध करून दिले गेले.

२)आंतरजातीय विवाह कायदा :-

हा कायदा १२ जुलै,१९१९ रोजी “कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधी कायदा” या नावाने गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला.या कायद्यान्वये संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना “जातिनिर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपआ पल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली गेली.” त्यांचे अशा प्रकारे होणारे आपआपसातील विवाह कायदेशीर ठरविले गेले. या कायद्याच्या एका कलमान्वये विवाहकाली पुरुषाचे वय १८ वर्ष पूर्ण व स्त्रीचे वय १४ वर्ष पूर्ण असले पाहिजे, असा निर्बंध घातला गेला.

३)क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :-

२ ऑगस्ट , १९१९ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागविण्याचे नाहीसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून केलेले कायदे आणि कोल्हापूरचे काडी मोडण्याचे (घटस्फोट) नियम हे स्त्रियांना संरक्षण देणारे आणखी दोन महत्त्वपूर्ण कायदे जारी केले गेले. अनेक कुटुंबात नवरा व त्याचे नातलग यांच्याकडून स्त्रीचा अनेक प्रकारचा छळ होत असे. काही छळांचे प्रकार असे असत की, छळ करणाऱ्या अपराध्यास इंडियन पिनल कोड मधील तरतुदीच्या मर्यादेत आणता येत नसे.या त्रुटींचा विचार करून छळाचा कोणताही प्रकार न्यायदेवतेच्या नजरेतून सुटणार नाही, अशा प्रकारचा सर्वसमावेशक कायदा महाराजांनी तयार केला.

४)घटस्फोटाचा व वारशाचा कायदा :-

घटस्फोटासंबंधीचा जो कायदा लागू केला त्यामध्येही स्त्रीच्या हक्कांचे संरक्षण कसे होईल , घटस्फोटानंतर तिच्या अन्नवस्त्रखर्चाची योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल; याकडे लक्ष ठेऊन कायद्याची तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल तर त्यांच्या ताब्याबद्दलची पोटगीबद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्थाही या कायद्याने लावली गेली. प्रस्तुत कायद्याने जात – पंचायतीच्या लहरीवर आधारलेल्या प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य करण्यात आला. तसेच तिच्या नैसर्गिक हक्कांना कायद्याचा “दृढ पाया” देण्यात आला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

५)देवदासी प्रथा प्रतिबंद कायदा :-

तत्कालीन समाजात, कनिष्ठ वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याची अनिष्ठ प्रथा मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. या प्रथेमधूनच समाजात जोगतीण, मुरळी, देवदासी, भावीण इत्यादी प्रकारच्या पतित स्त्रियांचा वर्ग अस्तित्वात आलेला होता. या वर्गाचे अस्तित्व म्हणजे समाजावरील कलंकच होता. हा कलंक निर्माण करणाऱ्या प्रथेस या कायद्याने प्रतिबंध करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला.

जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडल्या जात तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत. जनक घराशी त्यांचा काही संबंध रहात नसे. तसेच जनक आई – बापाच्या मिळकतीत त्यांचा काही वारसा हक्क रहात नसे.पण त्याच बरोबर देवाला सोडल्यामुळे संबंधित देवस्थानात तिला काही परंपरेने चालत आलेले विशिष्ट हक्क मिळत असत.

इंग्रजी संहितेच्या प्रस्तावनेत या कायद्याचा उद्देश स्पष्ट करताना शाहू महाराजांनी म्हंटले आहे : “The Position of those unfortunate girls who in accordance with very ancient custom is too frequently under the forms of religion consecrated in early childhood to a life of public immorality needs little comment. It is a blot upon the Hindu Law that it should have recognized such a practice and made a show of compensating girls thus forced from their tenderest years into a life of open infamy by certain concessions to their unique status and an implicit regularization of what is in fact an open and gross scandal. No such status with peculiar rights attaching to it, ought to be recognized and sanctioned by the law of any civilized state.”

*राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य लोकांसाठी केलेले कार्य :-

१)मागासवर्गीयांसाठी आरक्षण :-

शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठीची कल्पना न्यायमूर्ती रानडे आणि गोखले यांच्याकडून घेतली होती, हे शाहू महाराजदेखील मान्य करतात. आपल्या कोल्हापूर संस्थानामध्ये प्रशासकीय कामकाजात ५०% आरक्षण अस्पृश्यांसाठी ठेऊन महाराजांनी त्यांच्या कार्याचा प्रत्यक्ष् पुरावाच दिलेला दिसतो. अशा आरक्षणामुळे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामधील संघर्षाला तोंड फुटलेले दिसते. शाहू महाराजांनी ब्राह्मणेतरांच्या शिक्षण आणि प्रशासनातील रोजगाराच्या संधीच्या संदर्भात प्रयत्न केलेले दिसून येतात.

२) अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न :-

१८९४ मध्ये ज्या वेळी शाहू महाराजांची राजवट सुरु झाली. त्या वेळी कोल्हापूर संस्थानातील महार, मांग,चांभार,ढोर अशा अस्पृश्य जातीची लोकसंख्या सुमारे लाखाच्या आसपास होती. जोपर्यंत अस्पृश्यांना शिक्षणाच्या संधी मिळत नाहीत, तोपर्यंत अस्पृश्यता कमी होणार नाही या उद्देशाने अस्पृश्यांच्या शिक्षणासाठीचे कार्यक्रम त्यांनी हाती घेतले. १८९६-९७ मध्ये करवीरमध्ये अस्पृश्यांच्या ६ शाळा होत्या. शाहू महाराजांच्या प्रयत्नानंतर ही संख्या १९१० मध्ये २२ इतकी झाली. शाहू महाराजांनी खाजगी खर्चातून सोनतली, स्टेशन बंगला आणि रुकडी या ठिकाणी अस्पृश्यांसाठी वसतिगृहे उभारली. त्यांनी केवळ वसतिगृहेच उभारली नाहीत, तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी सवलत देण्याचा ठरावदेखील मान्य केला.

३)अस्पृश्यांच्या वेगळया शाळा बंद करण्याचे आदेश :-

शाहू महाराजांना अस्पृश्यांसाठी म्हणून असणाऱ्या स्वतंत्र शाळा मान्य नव्हत्या. ३० सप्टेंबर, १९१९ रोजी शाहू महाराजांनी एका आदेशाद्वारे कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांसाठी म्हणून असणाऱ्या शाळा बंद केल्या. सरकारी शाळेत ज्याप्रमाणे इतर जातीच्या मुलांना प्रवेश दिला जातो. तसा प्रवेश अस्पृश्यांच्या मुलांनाही मिळाला पाहिजे. सरकारी शाळेतील स्पृश्य- अस्पृश्यतेची प्रथा बंद करण्यात यावी आणि सर्व जातींच्या मुलांनी एकत्रित शिक्षण घ्यावे असा आदेश देण्यात आला. २८ ऑगस्ट , १९२१ रोजी असा आदेश काढला की, ज्याप्रमाणे ख्रिश्चन मिशनरी स्कूलमध्ये अस्पृश्यता विचारात न घेता प्रवेश दिला जातो.त्याप्रमाणे सरकारी शाळांमध्येदेखील प्रवेश दिला गेला पाहिजे. ज्या शाळांमधील शिक्षक प्रवेश देणार नाहीत अशा शाळांमधील शिक्षकांना पेन्शन व शाळेला अनुदान मिळणार नाही.

४)अस्पृश्यता खाजगी आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये संधी :-

शाहू महाराजांनी महार,मांग,चांभार,बेरड इत्यादींसारख्या दलित आणि गुन्हेगारी करणाऱ्या जातींना गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे कायदे केले व प्रत्यक्षात आपल्या राजवाड्यातील विविध पदांवर महार, मांग,बेरड समाजातील व्यक्तींना रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या तसेच कारकून, तलाठी, पोलीस यांसारख्या मध्यम दर्जाच्या पदावर अस्पृश्यांना संधी दिली. त्या काळात वकील, डॉक्टर यांसारख्या प्रतिष्ठित व्यवसायातील सनदा महार, मांग, चांभार, ढोर यांसारख्या अस्पृश्य जातींना देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले होते.

५)अस्पृश्यांच्या आडनावात बदल व महार वतन नष्ट :-

हिंदू समाजातील वर्णव्यवस्थेमुळे समाजजीवनातील व्यक्तिव्यक्तींमधील आहार पद्धती, पोशाख,व्यवसाय,मनोरंजन,घराची रचना, देव-देवता, अलंकार, वाहतुकीची साधने,सण – समारंभ इत्यादींसारख्या प्रसंगामध्ये भेद निर्माण केला होता. अशा स्वरूपाचा भेद आडनावांमध्ये सुद्धा आढळून येतो. आडनावावरून व्यक्तीच्या जातीचा परिचय होतो. म्हणून शाहू महाराजांनी अस्पृश्यांचे 'सूर्यवंशी' असे आडनाव निश्चित केले होते. कुस्तीच्या मैदानात जर महार, चांभार, भंगी जातीचा पहिलवान आला तर शाहू महाराज त्यांचा उल्लेख सरदार, जाट, पंडित म्हणून करीत असत. त्याचप्रमाणे परंपरागत गावगाड्यांमध्ये महार जातीला हलक्या प्रतीचे काम करावे लागत होते व अशा केलेल्या कामाचा मोबदला म्हणून जमिनीचा काही भाग वतन म्हणून दिला जात असे. परंतु अशा वतनासाठी त्यांना हलक्या स्वरुपाची कामे करावी लागत होती. त्यांची अशा स्वरुपाची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी म्हणून १८ सप्टेंबर , १९१८ रोजी एका आदेशाद्वारे शाहू महाराजांनी महारवतन संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला.

*शिफारशी :-
१)स्त्रियांसाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण अनिवार्य करावे.
२)महिला शिक्षिकांची नियुक्ती वाढवावी आणि त्यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण महाविद्यालये सुरु करावीत.
३)विधवा पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता देऊन त्यास प्रोत्साहन द्यावे.
४)सार्वजनिक विहिरी,पाणवठे,शाळा आणि इमारती सर्व जाति- धर्माच्या लोकांसाठी खुले करावेत.
५)आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता व प्रोत्साहन देऊन जातीव्यवस्था नष्ट करावी.
*निष्कर्ष :

शाहू महाराजांनी स्वत:च्या राजसत्तेचा उपयोग

**संदर्भ सूची (References)**

1. केतकर, शं. ग. (2004). राजर्षी शाहू महाराज. पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
2. पाटील, पी. बी. (2010). राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
3. कीर, धनंजय. (2013). महात्मा ज्योतिराव फुले. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
4. जाधव, आर. डी. (2015). महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळी. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
5. सरकार, सुमित. (2008). Modern India 1885–1947. दिल्ली : मॅकमिलन इंडिया.
6. ओक, गो. स. (2001). कोल्हापूर संस्थानाचा इतिहास. कोल्हापूर : राजहंस प्रकाशन.
7. महाराष्ट्र शासन. (2012). राजर्षी शाहू महाराज चरित्र व कार्य. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
8. फुले, ज्योतिराव. (1991). गुलामगिरी. पुणे : समता प्रकाशन.
9. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. (2014). जातिभेदाचा उगम व विकास. मुंबई : महाराष्ट्र शासन प्रकाशन.
10. Desai, A. R. (2005). Social Background of Indian Nationalism. New Delhi: Popular Prakashan.